नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०७/२०२५ (शनिवार)**

---

## चोरीचा गुन्हा उघड,चोरीस गेलेली मोटर सायकल जप्त, १ आरोपी अटक,खापा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापा** :- पोलीस स्टेशन खापा येथे फिर्यादी नामे पतीराम मनसाराम वरठी, रा. उमरी, ता. सावनेर जिल्हा. नागपूर यांच्या रिपोर्टवरून अपराध क्रं २९६/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयाची हकीकत अशा प्रकारे आहे की, दिनांक २६/०५/२०२५ रोजी चे रात्री १०:०० वा. सुमारास फिर्यादीचा मुलगा रितीक वरठी हा लग्ना कार्यक्रमाकरीता जवाहर शाळा, खापा येथे फिर्यादीच्या हिरो सप्लेंडर प्लस कंपनीची मोटार सायकल क्रं. एम एच ४० बी.डी. ७२९९ ने गेला होता व मो.सा जवाहर शाळा, खापा समोर सावनेर ते खापा रोड लगत पार्क केली होती. घरी परत जाते वेळी मो.सा ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने मोटर सायकील चोरून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून वरील प्रमाणे गुन्हा आहे.

दिनांक ११/०७/२०२५ रोजी गुप्त बातमीदाराच्या माहीतीच्या आधारे खापा पोलीसांनी पाटनसांवगी रोड वाकोडी फाटया जवळ रोडवर नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान आरोपी नामे कमलेश रामदास पंधरे, वय. २७ वर्ष, रा. बिल्डींग कॉ. नं. २०१ पंतप्रधान आवास योजना, नविन नगर, पारडी नागपूर याचे ताब्यात फिर्यादीची चोरीस गेलेली हिरो सप्लेंडर प्लस कंपनीची मोटार सायकल क्रं. एम एच ४० बी.डी. ७२९९ ही मिळून आल्याने आरोपीस ताब्यात घेवून त्याला गुन्हया संदर्भात विचारपुस केली असता त्याने सदर मोटर सायकल चोरी केल्याचे कबुल केले. सदर आरोपीला गुन्हयाच्या तपासकामी दिनांक ११/०७/२०२५ रोजी चे वेळ २१:३० वा.

अटक करण्यात आलेले आहे. **नमुद आरोपीच्या ताब्यातुन हिरो सप्लेंडर प्लस कंपनीची मोटार सायकल क्रं. एम एच ४० बी.डी .७२९९ जप्त करण्यात आली आहे.**




## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. २ लाख ४१ हजार ४१५ रूपयांचा मुद्देमाल जप्त देवलापार पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन देवलापार :— दिनांक **११/०७/२०२५ रोजी देवलापार पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की,** मौजा नवेगाव चिचदा शिवार, देशमुख यांचे विटभट्टीजवळ काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी धाड टाकली आणि  आरोपी नामे १) मनीष सुखदेव कुंभरे, वय ३३ वर्ष,

रा. उमरी ता: रामटेक, २) शिवचरण हरीचंद वाढवे, वय ४९ वर्ष, रा. मुर्डा, ता.रामटेक, ३) रामचंद्र यशवंत उईके, वय ४४ वर्ष, रा. पुसदा पुनर्वसन क्रमांक २ ता. रामटेक ४) ग्यानी प्रेमलाल उईके, वय ४० वर्ष, रा. चिचदा, ता. रामटेक ५) जिवतु दीवाळु मरस्कोल्हे, वय ६४ वर्ष, रा. कवडक दुधाळा, रामटेक, ह.मु चिचदा, नवेगांव ६) शुभम उर्फ सोनु चंद्रशेखर मेश्राम ,वय ३० वर्ष, रा. मुसेवाडी, ता. रामटेक  यांना ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना जागीच पकडले. आरोपी क्र. ७) रामदास गोमाजी डोंगर, रा. मुसेवाडी, ता. रामटेक, ८) राजु आसाराम मरस्कोल्हे, रा. नवेगांव चिचदा, ९) नंदु मनोहर गाते, रा. चिचदा, नवेगांव, हे आरोपी घटनास्थळावरून पळुन गेले. मिळुन आलेल्या **आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते, रोख रक्कम १४१५/— रूपये, घटनास्थळावरून १) मो.सा क्र.एम.एच ४० बीटी ६६९७, २) एम.एच ४० सी.पी ३११४ ३) एम.एच ४० बी.बी ३५२५ ४) एम.एच १२ ई.जे ९७२० ५) एम.एच ४० बी.बी ००५२ ६) एम.एच ३१ बी.झेड ६६३१ ७) मो.सा क्र.एम.एच ४० डि.ए ४२२५ वाहने एकुण किंमती २,४०,०००/— रूपये असा एकुण २,४१,४१५/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद ९ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन देवलापार येथे १२ (अ) म. जु. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ७०४ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १२/०७/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७०४ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ४० आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण १०५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस

स्टेशन वेलतुर २२ आरोपी अशा एकुण ११७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १२० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३९ आरोपी अशा एकुण १०८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे ३४ आरोपी अशा एकुण १२५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १२९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ७०४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**


पोलीस स्टेशन
एम.आई.डी.सी, बुटीबोरी
नागपूर जिल्हा ( ग्रमिण )
RR
WIRES & CABLES




Jul 12, 2025, 13:18


1998







मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने